# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:24.01.2025** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या,**

- पराक्रम दिनाचं औचित्य साधून दिल्लीत पंतप्रधानांचा शालेय विद्यार्थ्यांशी संवाद
- दावोसमध्ये राज्यासाठी विक्रमी 15 लाख 75 हजार कोटी रुपयांचे करार
- महाराष्ट्र भविष्यात डेटा सेंटरची राजधानी होईल -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास
- गुईलेन-बॅरे सिंड्रोम आजाराबाबत घाबरून न जाता काळजी घेण्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आवाहन

  आणि
- पर्यावरण, वनहक्क चळवळीतील ज्येष्ठ गांधीवादी नेते मोहन हिराबाई हिरालाल यांचं निधन

**पंतप्रधान**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीच्या संविधान सदनात त्यांना आदरांजली अर्पण केली. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही यावेळी नेताजींना अभिवादन केलं. यावेळी तिथं उपस्थित असलेल्या शालेय विद्यार्थ्यांशी पंतप्रधानांनी संवाद साधला. 2047 पर्यंत विकसित भारत बनवण्याच्या संकल्पाबद्दल पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांशी चर्चा केली. हे ध्येय साध्य करताना हवामान बदलाच्या आव्हानाचा सामना करण्यासाठी प्रदूषण टाळण्यासाठी, नैसर्गिक स्त्रोतांपासून वीजनिर्मितीसाठी सरकारनं हाती घेतलेल्या पंतप्रधान सूर्य घरसारख्या योजनांची तपशीलवार माहिती त्यांनी दिली.

**नेताजी,ठाकरे**

राज्यातही विविध ठिकाणी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आलं. शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त काल त्यांनाही अभिवादन करण्यात आलं. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांना जयंतीनिमित्त राजभवनात आदरांजली वाहिली.

**रंगीत तालीम**

प्रजासत्ताक दिनी नवी दिल्लीत होणाऱ्या मुख्य संचलनाची काल राजधानीत कर्तव्य पथावर रंगीत तालीम पार पडली. संचलनाच्या या रंगीत तालमीत लष्करी सामर्थ्याचं दर्शन घडविण्यात आलं. विविध राज्यांच्या चित्ररथांनी देशाच्या सांस्कृतिक समावेशकतेचं दर्शन घडवलं. प्रजासत्ताक दिनी राजधानीत होणाऱ्या मुख्य सोहळ्यात प्रजासत्ताक दिनाच्या राजधानीतील कर्तव्यपथावरील मुख्य सोहळ्यावेळी ध्वजारोहणानंतर

महाराष्ट्राची कन्या फ्लाईंग ऑफिसर दामिनी देशमुख ध्वजावर पुष्पवृष्टी करणार आहेत. बीड जिल्ह्याच्या वडवणी तालुक्यातील देवडी गावच्या दामिनी देशमुख वायुदलात फ्लाईंग ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत. प्रजासत्ताक दिन सोहळ्यात त्या परेड कमांडर म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत.

**प्रजासत्ताक दिन आमंत्रण**

प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या संचालनासाठी देशभरातल्या अनेक मान्यवरांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना आमंत्रित करण्यात आलं आहे. मन की बात या कार्यक्रमातून पंतप्रधानांशी संवाद साधणाऱ्या जळगाव जिल्ह्यातल्या शिरोड गावाच्या उपसरपंच कल्याणी पाटील यांनाही पंतप्रधान कार्यालयानं या कार्यक्रमासाठी आमंत्रित केलं आहे. त्याबाबत आकाशवाणीशी बोलताना कल्याणी पाटील म्हणाल्या -----------

**दावोस मुख्यमंत्री**

दावोसमधल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रानं जगभरातील विविध दिग्गज कंपन्यासमवेत विक्रमी 15 लाख 75 हजार कोटी रुपयांचे गुंतवणूकीचे सामंजस्य करार केले आहेत; यातून राज्यात 15 लाख 98 हजार रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांनी काल दावोसमधून दूरस्थ प्राणलीच्या माध्यमातून वार्ताहरांशी संवाद साधला. उद्योग मंत्री उदय सामंत मुंबईतून सहभागी झाले होते. दावोसमध्ये गुंतवणूकीचे 54 आणि धोरणात्मक सहकार्याचे 7 असे एकंदर 61 सामजंस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. महाराष्ट्र आता डेटा सेंटरची राजधानी होईल; असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**सामंत दावोस**

दावोसमध्ये जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रासाठी गुंतवणुकीचे ऐतिहासिक सामंजस्य करार होण्याची परंपरा सलग तिसऱ्या वर्षी कायम राहिली आहे, असं उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितलं. राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात काही हजार कोटींची गुंतवणूक यानिमित्ताने येणार असून औद्योगिक क्षेत्रात समतोल राखण्याचंही कामही महायुती सरकारनं केलं आहे, असं सामंत म्हणाले.

**जीबीएस**

पुणे शहर आणि परिसरात 59 जणांना गुईलेन-बॅरे सिंड्रोम आजाराची लागण झाली आहे, मात्र हा संसर्गजन्य आजार नाही, त्यामुळं नागरिकांनी घाबरुन जाऊ नये, असं आवाहन उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी काल केलं. याबाबत पुण्यात झालेल्या आढावा बैठकीनंतर ते काल बोलत होते. गुईलेन-बॅरे सिंड्रोम आजाराबाबत काळजी घेणं गरजेचंच आहे. पण याबाबत बऱ्याच वेगवेगळ्या चर्चा आणि अफवाही पसरवल्या जात आहेत; नागरिकांनी त्यावर विश्वास ठेऊ नये, असं आवाहन अजित पवार यांनी केलं आहे. या आजाराची लागण झालेले बहुतेक जण पुण्यातच विविध रुग्णालयात दाखल झाले आहेत, त्यांच्यावर उपचारही सुरू आहेत, असं पवार म्हणाले.

**वसंत दादा शुगर इंस्टीट्यूट सभा**

साखर कारखानदारीत काळानुसार बदल आवश्यक आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात केलं. वसंतदादा शुगर इंस्टीट्यूटची 47 वी वार्षिक सर्वसाधारण सभा काल झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विविध साखर कारखान्यांना पारितोषिकं प्रदान करण्यात आली. ज्येष्ठ नेते शरद पवार, संस्थेचे उपाध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी अजित पवार म्हणाले-
बाईट- अजित पवार

**अमित शाह**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. मुंबईत राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि विकास महामंडळाच्या कॉर्पोरेट कार्यालयाचं उद्घाटन शहा यांच्या हस्ते होणार आहे. तसंच ते नाशिक आणि मालेगावलाही भेट देणार आहेत.

**राज्यपाल कृषी**

मराठवाड्यातल्या कृषि विद्यापीठानं शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कृषि संशोधनावर अधिक भर द्यावा, असं आवाहन राज्यपाल आणि कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी काल केलं. परभणी इथं वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या सव्वीसाव्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे या कार्यक्रमाला उपस्थित होते. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना या समारंभात राज्यपालांच्या हस्ते मानद डॉक्टरेट पदवी देऊन सन्मानित करण्यात आलं.

**अंकुश चव्हाण**

संरक्षण मंत्रालयाच्या पुण्यातल्या दक्षिण मुख्यालयाच्या जनसंपर्क अधिकारीपदी अंकुश चव्हाण यांची नियुक्ती झाली आहे. 2009 मध्ये भारतीय माहिती सेवेत रुजू झाल्यानंतर अंकुश चव्हाण यांनी नवी दिल्लीत गृह मंत्रालय, चित्रपट महोत्सव संचालनालयाच्या तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या नांदेड, रत्नागिरी, कोल्हापूर, सोलापूर आणि गोवा इथल्या केंद्रीय संचार ब्यूरो आणि मुंबई दूरदर्शनसह विविध पदांवर 15 वर्षे कार्य केलं आहे. त्यांच्याकडे केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर आणि प्रकाशन विभाग पुणे या दोन कार्यालयांचा अतिरिक्त प्रभार सोपवण्यात आला आहे.

**मोहन हिरालाल निधन**

पर्यावरण आणि वनहक्क चळवळीतले ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते मोहन हिराबाई हिरालाल यांचं काल मध्यरात्रीच्या सुमारास नागपूरमधे निधन झालं. ते 75 वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. गडचिरोलीतील लेखा मेंढा गावाला देशपातळीवर ओळख निर्माण करुन देणारे मोहन हिराबाई हिरालाल यांच्यावर महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या विचारांचा प्रभाव होता.
लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या छात्र युवा संघर्ष वाहिनीचे ते सक्रीय सदस्य होते. 1984 मध्ये गडचिरोली जिल्ह्यात त्यांनी वृक्षमित्र संघटनेची स्थापना केली. गावच्या निर्णयांमधे महिलांचा सहभाग, दारूबंदी, वनसंरक्षण आणि हक्क, भ्रष्टाचाराविरुद्ध लढा, ग्रामस्वराज, इत्यादी क्षेत्रात त्यांनी जनजागृतीचं कार्य केलं. त्यांच्या पुढाकाराने गडचिरोली जिल्ह्यातलं मेंढा – लेखा गाव सर्वसहभागानं कारभार करणारं गाव म्हणून आकाराला

आलं. 2009 मधे सरकारकडून सामुदायिक वनहक्क मिळालेलं ते पहिलं गाव ठरलं. त्यांना जमनालाल बजाज पुरस्कारासह विविध सन्मान देऊन गौरवण्यात आलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, काँग्रसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश आणि इतर मान्यवरांनी मोहन हिराबाई हिरालाल यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**सोनार निधन**

प्रसिध्द लेखक प्राध्यापक अनिल सोनार यांचं काल पहाटे धुळ्यात निधन झालं. ते 79 वर्षांचे होते. अनिल सोनार यांनी  नाटक, कादंबरी, कथा, कविता, लेख एकांकिका, बालवाङ्मय, विडंबन काव्य, नभोनाट्य, पटकथा असं विविध प्रकारचं विपुल लेखन केलं आहे. मराठी बरोबरच हिंदी नाटकाचंही लेखन त्यांनी  केलं आहे. त्यांच्या पार्थिव देहावर धुळ्यातील एकविरा देवी स्मशानभूमीत काल दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

**हवामान**

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**